# आदेश

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ मे २००२

**अधिनियम, १९५८**

क्रमांक :मुद्रांक - २००२/८७५/प्र.क्र.१७३/म-१; मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (मुंबई १९५८ चा ६०) (यानंतर ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करता येईल) च्या कलम ९ च्या पोटकलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन या आदेशाद्वारे दिनांक १ मे,२००२ पासून गृह कर्जाच्या संदर्भात निष्पादीत करण्यात येणा-या गहाणखताच्या दस्तांवर संबंधित दस्तासोबत बँकेचे मंजूरी पत्र असेल व संबंधित दस्तऐवजात कर्जाचा हेतू स्पष्टपणे नमूद केलेला असेल अशा दस्तांच्या बाबतीत उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद ३३ (ब)(२), अनुच्छेद ४० (ब) व अनुच्छेद ५४ (२) अन्वये देय असलेले मुद्रांक शुल्क mi Loo रुपयास अथवा त्याच्या भागास दोन रुपये पन्नास पैसे एवढया मर्यादेपर्यन्त कमी करत आहे.

स्पष्टीकरण : या आदेशाच्या प्रयोजनार्थ ,-

(अ) " बँक " या संज्ञेमध्ये सार्वजनिक उपक्रमातील बँका गृह कर्ज देणा-या वित्तीय संस्था सहकारी बँका आणि गृह कर्जामध्ये काम करणा-या अनुसूचित बँकेचा समावेश आहे;

(ब) "गृह कर्ज " या संज्ञेत घर खरेदीसाठी, दुरुस्तीसाठी अथवा त्याच्या बांधकामासाठी किंवा गृह योजनेच्या कामासाठी अथवा निवासी प्रयोजनार्थ खरेदी केलेली जमीन याकरीता दिलेले कर्ज अथवा अग्रिम याचा समावेश 3(it.?.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रमाकांत असमर )
शासनाचे सहसचिव